<u>नियमीत दिवाणी दावा क्र.२३३/२०१९</u>
<u>त्र्यंबक मुसळे वि. रसुल पिरसाब शेख</u>
<u>नि.क्र.५२</u>

<u>**वादीतर्फे सा.क्र.२**</u>

**नावः** **जानीमियाँ रशिद शेख**
**वयः** **६० वर्षे**
**व्यवसायः** **सेवानिवृत्त, निमतानदार**
**पत्ताः** **अंदोरा, ता.औसा, जि.लातूर**

<u>**वादीतर्फे सा.क्र.२ यांचा शपथेवर सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.आर.टी.काकडे यांच्याद्वारेः-**</u>

मला कोर्टामार्फट कोर्ट कमिशनर म्हणून मोजणी करण्यासाठी पत्र प्राप्त झाले. त्याप्रमाणे मी दफ्तरी नोंद घेतली. मो.र.नं.२०/२०२३ या जमिनीची मोजणी मी केली. मी जागेवर जाऊन वादी व प्रतिवादी यांच्यासमक्ष गट नं.४२ सोनवळा येथील जमिनीची मोजणी केली. दि.२६/१२/२०२३ रोजी मी तेथे गेलो. वादी व प्रतिवादी यांच्या समक्ष दाखवलेल्या वहिवाटीप्रमाणे खाणाखुणा करून मशिनच्या सहाय्याने मोजणी केली. मी मोजणी करण्याकामी मुळ कागदपत्र घेऊन हजर होतो. मी मोजणी करण्यापूर्वी सर्वांना रितसर नोटीस दिलेली होती. मी ११.०० ते ११.३० दरम्यान मोजणी करण्यास सुरुवात केली ते ०३.०० ते ०३.३० वाजेपर्यंत पूर्ण केली. वादींचे गट क्र.४२ मध्ये दोन ठिकाणी वहिवाट होती. एका ठिकाणी ०६ गुंठे क्षेत्र रामराव मानसींग यांच्या वहिवाटीला गेल्याचे दिसले. दुसऱ्या ठिकाणी ११ गुंठे क्षेत्र अशोक प्रल्हा

नागरगोजे यांनी अतिक्रमण केल्याचे दिसून आले. मी नकाशा तयार केला व क–प्रत कोर्टाला पाठवली. मला नकाशाची क–प्रत दाखवली, ती तीच आहे, ब–प्रतिप्रमाणे त्यातील रेकॉर्ड खरा व बरोबर आहे. अतिक्रमण झालेले क्षेत्र एका ठिकाणी निळा रंगात असून दुसऱ्या ठिकाणी लाल रंगात दाखवलेले आहे. मला नकाशा दाखवला, तो तोच आहे, त्यावर आमच्या कार्यालयाचे सहीशिक्के आहेत, त्यावर माझी सही आहे, त्याला **नि.क्र.५३** देण्यात आला. मी मग त्या ठिकाणी पंचनामा केला. मला पंचनामा दाखवला, तो तोच आहे, त्यावर वादी व साक्षीदारांच्या सह्या आहेत, त्याला **नि.क्र.५४** देण्यात आला. मी तो नकाशा व पंचनामा कोर्टाला अहवालासोबत पाठवून दिला.

**साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ७, १०,११, १७ ते २१ तर्फे श्री.गादगे वकील यांना पुकारले असता त्यामुळे उलटतपास नाही.**

**साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.९, १२ ते १५ यांच्यातर्फे श्री.एस.बी.हाळीकर वकील यांच्याद्वारे सुरूः**

माझ्या नि.क्र.५३ च्या नकाशामध्ये लाल रंगाने दाखवलेले क्षेत्र वादीच्या कब्जास कमी आलेले क्षेत्र म्हणून दाखवलेले आहे. तसेच निळ्या रंगात दाखवलेले क्षेत्र वादी यांना कमी असणारे क्षेत्र ०.६ आर नमूद केलेले आहे. त्या ठिकाणी अतिक्रमण हा शब्द मी लिहिलेला नाही. अतिक्रमण केलेले क्षेत्र हे कमी झालेले क्षेत्र असते महणून नकाशात अतिक्रमण शब्द नमूद केलेला

नाही. तर साक्ष देताना कमी असणारे क्षेत्र अतिक्रमीत क्षेत्र म्हणून उल्लेख केलेला आहे. तशी कमी असणारी क्षेत्र व अतिक्रमीत असणारी क्षेत्र याबाबत कोणताही कायदा हे सांगणारा पारीत झालेला नाही.

लाल रंगाने दाखवलेले क्षेत्र हे अशोक प्रल्हाद नागरगोजे यांच्या कब्जात असल्याचे मी नकाशात पाहून सांगतो आणि निळ्या रंगाचे क्षेत्र रामराव मानसींग नागरगोजे यांच्या कब्जात आहे. प्रतिवादी क्र.९, १२ ते १५ यांच्या नावाने कोणतेही अतिक्रमण मला दिसून आले नाही.

पूनःतपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
VIJAY RAMCHANDRA
GHARAL
Date: 2025.11.03
16:57:31 +0530

**( श्री. व्ही. आर. घराळ )**

**ठिकाणः उदगीर** — **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**दिनांकः– ०३/११/२०२५** — **उदगीर.**